I O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): सातारा  P.S.(ठाणे): कोरेगांव  Year (वर्ष): 2019

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0082  Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/03/2019 00:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्हाची घटना):

1. Day(दिवस): शुक्रवार  Date From (दिनांक पासून): 29/03/2019

Time Period (कालावधी):  Date To ( दिनांक पर्यंत): 29/03/2019

Time From (वेळेपासून): 17:00 बजे

Time To (वेळेपर्यंत): 23:00 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 30/03/2019  Time (वेळ): 00:30 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद 002  Date & Time (दिनांक आणि वेळ): 30/03/2019 00:48 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्तळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 0.5 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): जिप बांधकाम उपविभाग, कोरेगांव कार्यालय येथे,कोरेगांव

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव): कोरेगांव

District(State) (जिल्हा(राज्य)): सातारा(महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): फारुख जाफर शेख

(b) Father's Name (वडील का नाव) : जाफर शेख

(c) Date/Year of Birth (जन्म 1989  (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):  Date of Issue (अदा केल्याची तारीख):

Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो देऊर, ता कोरेगाव, ,जि सातारा,वाठार ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो देऊर, ता कोरेगाव, ,जि सातारा,वाठार ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9130907436

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश आनंदा गायकवाड शाखा अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग कोरेगांव | | वडील का नाम : आनंदा गायकवाड | 1. मैत्रीय रेसिडन्सी, सुतार कलन,, संभाजी नगर, सातारा ,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):

मी, फारुख जाफर शेख, वय 30 वर्षे, व्यवसाय - बांधकाम व्यवसायीक व मजुरी, रा. मु.पो. देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा, मोबाईल नंबर 9130907436समक्ष कोरेगांव पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून देतो खबरी जबाब की, मी वाठार येथील रहिवासी असुन मी, माजी सैनिक व मागसवर्गीय मजुर सहकारी संस्था लि. सातारा या संस्थेचा, पोटठेकेदार म्हणुन कामे करत असतो.देऊर ता.कोरेगांव येथील पशुवैदयकिय दवाखान्याचे संरक्षण भिंती बांधण्याचे कामाची जाहीरात निघाली. त्यावेळी मी, माझे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा देऊर येथील बक खात्यामधुन माजी सैनिक व मागसवर्गीय मजुर सहकारी संस्था लि. सातारा या संस्थेमार्फत वरील कामासंदर्भात डी.डी. भरलेला होता. त्यानंतर सदरचे काम, माजी सैनिक व मागसवर्गीय मजुर सहकारी संस्था लि. सातारा या संस्थेस मिळाले होते व संस्थेने ते काम पोट ठेकेदार म्हणुन मला दिले होते. सदरचे बांधकाम मी माझ्या पैशातुन वेळेत पुर्ण करुन दिले होते. तसेच सदर कामासाठी मी वेळोवेळी उप-अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग, कोरेगाव यांचे कार्यालयात जावुन सदर कामाचे बिल निघण्याचे संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे.मी, देऊर ता.कोरेगांव येथील पशुवैदयकिय दवाखान्याचे संरक्षण भिंती बांधणेचे पुर्ण केलेल्या कामाचे बिल तयार करुन जिल्हा परिषद सातारा येथे पाठविण्यासाठी कोरेगांव येथील उप-अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग, या कार्यालयातील गायकवाड साहेब यांना मागील आठवडयात भेटलो होतो. त्यावेळी त्यानी मला, तुमचे बिल आम्ही तयार करुन जिल्हा परिषद सातारा येथे पाठवतो पण कुंभार साहेबांचे व माझे असे आमचे दोघांचे 25000/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन, तुम्ही माझे कामाचे बिल तयार करुन पाठवा, माझे बिल मंजुर झाले की तुमचे काम करतो असे म्हणालो. त्यावेळी गायकवाड साहेबांनी, तु आम्हाला 25,000/- रुपये दिले नाहीतर पुढच्या मिळणाऱ्या कामामध्ये तु अडचणीत येशील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, मला पैसे मिळाल्यानंतर तुमची भेट घ्यायला येतो असे सांगितले. त्यानंतर कोरेगांवचे गायकवाड साहेबांनी माझे प्रकरण दि.20/03/2019 रोजी जि.प.सातारा यांना पाठविले. त्यानंतर दिनांक 26/03/2019 रोजी संस्थेचे नावे पैसे जमा झाल्यानंतर संस्थेकडुन मला आज रोजी माझ्या कामाचे बिल रोख मिळाले. कोरेगाव येथील उप-अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग, कोरेगाव कार्यालयातील कुंभार साहेब व गायकवाड साहेब यांना भेटुन त्यांनी मागणी केल्याप्रमाणे पंचवीस हजार रुपये मी दिले नाहीत तर ते मला यापुढे मिळणाऱ्या कामात अडचणी आणतील म्हणुन मी, दिनांक 29/03/2019 रोजी न्टी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात हजर राहुन जि.प. बांधकाम उपविभाग कोरेगाव या कार्यालयातील कुंभार साहेब व गायकवाड साहेब लाच मागणी करत असल्याचे सांगुन माझा लेखी तक्रारी अर्ज हजर केला. त्यानंतर पोनि.मुल्ला मडम यांनी मा.उपजिल्हाधिकारी सातारा यांचेकडील श्री योगेश उत्तमराव बोरकर, लिपीक व श्री. विजयकुमार रामचंद्र धायगुडे, नायब तहसलिदार या दोन पंचांची सेवा उपलब्ध करुन घेतली. दोन्ही पंच हजर झाल्यानंतर माझी व दोन्ही पंचांची तसेच सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझा लेखी तक्रार पोलीस निरीक्षक आरीफा मुल्ला मडम यांचेकडे हजर केला होता

त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन केले. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे याची कोरेगाव येथे जावुन पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन बोरकर व पंच नं. 2 म्हणुन धायगुडे यांनी काम करण्याचे पोनि.मुल्ला मडम यांनी ठरवुन माझ्या तक्रारीवर त्यांनी सहया केल्या. त्यानंतर कोरेगांव येथे जावुन पडताळणी करण्यासाठी मी व पंच नं. 1 बोरकर असे माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन, पोनि.मुल्ला, पोलीस उपअधीक्षक श्री. शिर्के साहेब पंच नं. 2 धायगुडे व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनातुन एसीबी कार्यालय सातारा येथुन निघुन कोरेगांव रेल्वे स्टेशन रोडवर आडोशास वाहन थांबविले. मुल्ला मडम यांनी, मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं. 1 यांचेसोबत कुंभार साहेब व गायकवाड साहेब यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. सदर पडताळणी कारवाईमध्ये कोरेगांव जि.प.बांधकाम उपविभाग कार्यालयातील गायकवाड साहेब यांची भेट झाली. त्यावेळी गायकवाड साहेब यांनी, मी, मौजे देऊर ता.कोरेगांव येथील पशुवैद्यकिय दवाखान्याचे संरक्षण भिंतीचे केलेल्या कामाचे बिल तयार करुन जिल्हा परिषद सातारा येथे पाठविल्याचे मोबदल्यात 10000/- रुपयांची लाच मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची, रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन पोनि. मुल्ला मडम, पोलीस उपअधीक्षक श्री.शिर्के साहेब यांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर मुल्ला मडम यांचे सुचनेनुसार मी 10,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाई संबंधाने मुल्ला मडम यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या दुचाकी वाहनावरुन गायकवाड साहेबांची भेट घेण्याकामी जि.प. बांधकाम उप विभाग कोरेगाव येथील कार्यालयाकडे रवाना केले. शिर्के साहेब, मुल्ला मडम व सापळा पथक आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन खाजगी वाहनाने आले. मी व पंच नं. 1 बोरकर असे आम्ही दोघे जि.प. बांधकाम उप विभाग कोरेगाव येथील कार्यालयात गेलो. त्याठिकाणी गायकवाड साहेब व माझी भेट झाली त्यावेळी त्यांचेत व माझ्यात पैशांबाबत चर्चा झाली. त्यावेळी गायकवाड साहेबांनी मला 10,000/- रुपये लाच मागणी केली. त्यावेळी मी माझ्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुचे खिशातील अंथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली 10,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन गायकवाड साहेब यांचे समोर धरली. त्यावेळी ती लाच रक्कम गायकवाड साहेबांनी त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटचे पाठीमागील डाव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी कार्यालयातुन बाहेर येवुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन श्री. शिर्के साहेब, मुल्ला मडम व पथक माझ्या जवळ आले. मुल्ला मडम यांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर कार्यालयातच पोनि. मुल्ला मडम यांनी पथकाच्या सहाय्याने गायकवाड साहेबांच्या तपासण्या केल्या. त्यानंतर पोनि.मुल्ला मडम यांचेकडुन गायकवाड साहेब यांच्या डाव्या हाताचे बोटांचे पे-यांना व तळहातास तसेच त्यांचे पन्टचे पाठीमागील डावे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आल्याचे सांगितले. त्यानंतर मला कार्यालयात बोलावुन माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.त्यानंतर कार्यालयातील कारवाई संपल्यानंतर गायकवाड साहेबांना ताब्यात घेवुन शिर्के साहेब, मुल्ला मडम व दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे खाजगी वाहनाने तसेच मी व पोक. खरात असे माझ्या दुचाकी वाहनावरुन कोरेगांव येथुन निघुन एसीबी सातारा कार्यालयात आलो. त्यावेळी पोनि.मुल्ला मडम यांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मला कार्यालयात बोलावुन घेवुन दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर मुल्ला मडम यांनी, माझे व पंच नं. 1 बोरकर यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कार्यालयात बोलावुन घेवुन हकिकत विचारली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा एसीबी कार्यालय सातारा येथे टंकलीखीत करुन पुर्ण केला.तरी सुरेश आनंदा गायकवाड, वय 41 वर्षे, शाखा अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग कोरेगांव, रा.मैत्रीय रेसिडन्सी, सुतार कलनी, संभाजी नगर, सातारा यांनी मी, मौजे देऊर ता.कोरेगांव येथील पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी - 1 येथील संरक्षण भिंतीचे केलेल्या कामाचे बिल तयार करुन जिल्हा परिषद सातारा येथे पाठविल्याचे मोबदल्यात 10,000/- रुपयांची लाच मागणी केली व त्यानंतर आयोजित केले सापळा कारवाईमध्ये सुरेश आनंदा गायकवाड यांनी जि.प. बांधकाम उपविभाग कोरेगांव कार्यालयात 17.06 वाजण्याचे सुमारास माझ्याकडुन 10,000 /- रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचे विरुध्द तक्रार आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): dadasaheb baburao chudappa(I (Inspector)) / pi or

Rank (पद):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे

No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाम): dadasaheb [illegible]rao chudapp

Rank(पद): I[illegible]c,

No.(सं.): pi